३६ साप्ताहीक RNI No. : MAHMAR2009/28514 www.samajsatta.com

# समाज सत्ता

www.samajsatta.com
Mo. : 9049940157

वर्षे १६ वे | अंक ३६ | पुणे, सोमवार, दि. ११ मे ते १७ मे २०२६ | मुल्य : २ रु | पान ४



## हवेली पंचायत समितीत, मदतनीस ते सेविका पदोन्नतीने नियुक्ती झालेल्या अंगणवाडी सेविकांचा सन्मान

**उरुळी कांचन : प्रतिनिधी ( सुनील तुपे )**

एकात्मिक बालविकास सेवा योजना, पंचायत समिती हवेली यांच्या वतीने अंगणवाडी मदतनीस पदावरून 'अंगणवाडी सेविका' पदी नियुक्ती मिळालेल्या भगिनींचे विशेष अभिनंदन व सन्मानपत्र वितरण उत्साहात पार पडले. पंचायत समिती हवेलीचे सभापती श्री. युवराज काकडे यांच्या शुभहस्ते नियुक्ती झालेल्या सेविकांना सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले. यावेळी हवेली विभागाच्या बालविकास प्रकल्प अधिकारी निलम भुमकर, उरुळीकांचन विभागाचे बालविकास प्रकल्प अधिकारी अक्षय नजन, हवेलीच्या सहाय्यक बालविकास प्रकल्प अधिकारी स्वाती पाठक, पर्यवेक्षिका मीरा टेकवडे, पर्यवेक्षिका रुपाली जगताप, कनिष्ठ सहाय्यक लालपोतू मॅडम, थेऊरचे माजी ग्रामपंचायत सदस्य काशिनाथ कोळेकर, दत्तात्रय कोळेकर व सर्व पदोन्नती झालेल्या अंगणवाडी सेविका उपस्थित होत्या.

हवेली तालुक्यात कार्यरत अंगणवाडी मदतनीस पैकी १२ वी पास शैक्षणिक अहर्ता अट व २ वर्ष अनुभव असणाऱ्या, शासन निर्णयानुसार पात्र एकूण ७ अंगणवाडी मदतनीस यांना अंगणवाडी सेविका पदावर नियुक्ती देण्यात आली.

यावेळी बोलताना सभापती श्री. युवराज काकडे म्हणाले की, अंगणवाडी मदतनीस म्हणून काम करताना या भगिनींनी अतिशय मेहनतीने आणि निष्ठेने योगदान दिले आहे. भविष्यात बालकांचा विकास आणि रचनात्मक समाज निर्मितीच्या कार्यात त्यांचे योगदान मोलाचे ठरेल. सेविका पदाची जबाबदारी मोठी असून, तांत्रिक व बौद्धिक क्षमतेचा वापर करून या भगिनी उत्कृष्ट कार्य करतील, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला. तसेच पुढील काळात अंगणवाडीत शिकणाऱ्या सर्व लहान बालकांना, पंचायत समितीच्या माध्यमातून सर्वोतपरी मदत व सहकार्य करणार असल्याचे काकडे यांनी नमूद केले.

## 'लँड टायटलिंग क्ट' जुलैमध्ये लागू होणार; महाराष्ट्र ठरणार देशातील पहिले राज्य- महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे

- **शासनाकडून कृत्रिम बुद्धिमत्ता धोरणांतर्गत दीड हजार कोटीचे करार**

**पुणे :** 'लँड टायटलिंग क्ट' येत्या जुलै महिन्यात राज्यात लागू होणार असून असा कायदा करणारे महाराष्ट्र हे देशातील पहिले राज्य ठरणार आहे. या कायद्यामुळे राज्यातील १४ कोटी जनतेची मालमत्ता ही निश्चित प्रॉपर्टी म्हणून गणली जाणार असून जगातील कुठल्याही देशात ती कॅश करता येईल, असे प्रतिपादन राज्याचे महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांनी केले.

भारती विद्यापीठाच्या ६२ व्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित कार्यक्रमात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. यावेळी शिक्षण मंत्री दादाजी भुसे, आमदार भीमराव तापकीर, भारती विद्यापीठाचे कार्यवाह आमदार डॉ. विश्वजीत कदम, कुलपती डॉ. शिवाजीराव कदम, ज्येष्ठ पत्रकार राजदीप सरदेसाई, कुलगुरू डॉ. विवेक साळवी यांच्यासह विद्यापीठाचे पदाधिकारी उपस्थित होते. श्री.बावनकुळे म्हणाले, स्वर्गीय डॉ. पतंगराव कदम यांनी शिक्षण क्षेत्रात उभारलेले कार्य हे महाराष्ट्राच्या अभिमानाचे प्रतीक आहे. 'गल्लीतली शाळा' ते भारती विद्यापीठाला जागतिक स्तरावर नेण्याचा संकल्प केला आणि तो पूर्ण करून दाखवला. त्यांच्या विचारांचा प्रकाश आज देश-विदेशात पोहोचत आहे. ते म्हणाले, शिक्षणाशिवाय विकसित भारताची संकल्पना पूर्ण होऊ शकत नाही. राज्य शासनाने कृत्रिम बुद्धिमत्ता (-ख) धोरण राबवून दीड हजार कोटी रुपयांच्या गुंतवणुकीचे करार केले आहेत. तसेच दीड लाख विद्यार्थ्यांना कृत्रिम बुद्धिमत्ता ( ए. आय)तंत्रज्ञानाचे प्रशिक्षण देण्यास सुरुवात केली आहे. आगामी काळात विद्यापीठांनी तंत्रज्ञान आणि ए.आय. स्वीकारणे अत्यावश्यक आहे. विद्यार्थ्यांना शैक्षणिक कागदपत्रांसाठी कोणत्याही स्टॅम्प पेपरची आवश्यकता राहिलेली नसून विविध प्रमाणपत्रे विनामूल्य उपलब्ध करून देण्यात येत आहेत. 'छत्रपती शिवाजी महाराज महसूल अभियान' अंतर्गत राज्यातील ३० लाख विद्यार्थ्यांपर्यंत आवश्यक कागदपत्रे मोफत पोहोचविण्याची व्यवस्था उभी करण्यात आल्याचे त्यांनी सांगितले. लोकाभिमुख, पारदर्शक आणि गतिमान प्रशासन हीच छत्रपती शिवाजी महाराजांची प्रेरणा असल्याचे सांगत सरकारने समाजाच्या शेवटच्या घटकापर्यंत पोहोचले पाहिजे, असेही ते म्हणाले. नागपूर येथे भारती विद्यापीठाचा विस्तार व्हावा, अशी अपेक्षा व्यक्त करत त्यांनी आवश्यक जागा व शासनस्तरीय सहकार्य देण्याची ग्वाही दिली. तसेच 'टिटबिट पॉलिसी'च्या माध्यमातून अडचणीत असलेल्या भूखंडांचा मार्ग काढण्याबाबतही सकारात्मक भूमिका मांडली. यावेळी शिक्षण मंत्री दादाजी भुसे म्हणाले, शिक्षणानेच माणसाची प्रगती होऊ शकते हा संदेश देत पद्मभूषण कर्मवीर भाऊराव पाटील यांनी शिक्षणाची चळवळ उभी केली. त्याच ध्येयाने स्वर्गीय डॉ. पतंगराव कदम यांनी प्रतिकूल परिस्थितीतून शिक्षण क्षेत्रात वटवृक्ष उभा केला. एका छोट्या खोलीत सुरू झालेल्या शाळेचे आज जागतिक पातळीवरील विद्यापीठात रूपांतर झाले असून हे कार्य प्रेरणादायी असल्याचे त्यांनी नमूद केले. ग्रामीण व गरीब विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण शिक्षण उपलब्ध करून देणे ही काळाची गरज असल्याचे सांगत त्यांनी शिक्षणासोबत संस्कार, राष्ट्रभक्ती आणि शिस्तही महत्त्वाची असल्याचे अधोरेखित केले. विद्यार्थ्यांसाठी कृत्रिम बुद्धिमत्ता शिक्षण, सैनिक प्रशिक्षण, विद्यार्थिनींसाठी सेल्फ डिफेन्स प्रशिक्षण, शिक्षकांचे प्रशिक्षण, शाळांमध्ये स्वच्छ पिण्याचे पाणी व स्वच्छतागृहे यांसारख्या उपक्रमांवर शासन भर देत असल्याचे त्यांनी सांगितले.

## विभागीय आयुक्त कार्यालयात लोकशाही दिनात चार प्रकरणांवर सुनावणी

**पुणे :** विभागीय आयुक्त कार्यालयात विभागीय आयुक्त डॉ. चंद्रकांत पुलकुंडवार यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या विभागीय लोकशाही दिनात पुणे जिल्ह्यातील चार प्रकरणांवर सुनावणी घेण्यात आली. यावेळी कोल्हापूर परिक्षेत्राचे पोलीस महासंचालक सुनील फुलारी यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी, तक्रारदार उपस्थित होते. जिल्हा स्तरावर येणाऱ्या तक्रार अर्जांवर जिल्हास्तरीय लोकशाही दिनात उचित कार्यवाही होणे आवश्यक असून त्यासाठी निर्णय देताना नियम व कायद्याच्या तरतुदीचे पालन करावे, अशा सूचना डॉ.पुलकुंडवार यांनी दिल्या. विभागातील सर्वसामान्य जनतेच्या तक्रारी, अडचणी यांची शासकीय यंत्रणेकडून न्याय्य पद्धतीने व तत्परतेने सोडवणूक करण्यासाठी दर महिन्याच्या दुसऱ्या सोमवारी विभागीय आयुक्त कार्यालयात विभागीय लोकशाही दिनाचे आयोजन करण्यात येते. या लोकशाही दिनात नव्याने दाखल चार प्रकरणांचा समावेश होता. या अर्जदारांना तसेच संबंधित विभागाच्या अधिकाऱ्यांना सोबतच्या कागदपत्रांसह आपले म्हणणे मांडण्याची संधी देऊन श्री. पुलकुंडवार यांनी सुनावणी घेतली.

## ह.भ.प. आनंद महाराज तांबे यांना 'हवेली वारकरी भूषण पुरस्कार २०२६' प्रदान

- **पाचशेहून अधिक टाळकऱ्यांच्या उपस्थितीत 'वासंतिक चंदनउटी मोगरा आरास वारकरी भजन व संमेलन' उत्साहात संपन्न**

**उरुळी कांचन : प्रतिनिधी ( सुनील तुपे )**

थेऊर, ता. हवेली : हवेली तालुका वारकरी संप्रदायाच्या वतीने श्रीक्षेत्र थेऊर येथे आयोजित करण्यात आलेल्या 'वासंतिक चंदनउटी मोगरा आरास वारकरी भजन व संमेलन' या भव्य धार्मिक सोहळ्यात अखिल भारतीय वारकरी मंडळ महाराष्ट्र राज्याचे उपाध्यक्ष व थेऊर गावचे भूषण ह.भ.प. श्री आनंद महाराज विश्वनाथ तांबे यांना प्रतिष्ठेचा 'हवेली वारकरी भूषण पुरस्कार २०२६' प्रदान करून गौरविण्यात आले. अभंग, भजन, हरिनाम सप्ताह, कीर्तन आणि टाळ-मृदुंगाच्या निनादात पार पडलेल्या या सोहळ्याने संपूर्ण थेऊर नगरी भक्तिरसात न्हाऊन निघाली.

श्री महातारी माता मंदिर परिसरात आयोजित या संमेलनासाठी हवेली तालुक्यातील विविध गावांमधून वारकरी, भजनी मंडळे, दिंडी प्रमुख, कीर्तनकार, प्रवचनकार, महिला दिंडी तसेच युवक वारकरी मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. ज्ञानोबा-तुकोबा यांच्या जयघोषाने परिसर दुमदुमून



गेला होता. संत तुकाराम महाराजांच्या अभंगातून समाजात बंधुभाव, समता आणि एकतेचा संदेश देण्यात आला.

कार्यक्रमाचे प्रमुख निमंत्रक ह.भ.प. आनंद महाराज तांबे यांनी वारकरी संप्रदाय, संत साहित्य आणि समाजप्रबोधन क्षेत्रात केलेल्या उल्लेखनीय कार्याचा गौरव यावेळी करण्यात आला. मान्यवरांच्या हस्ते त्यांना शाल, श्रीफळ, सन्मानचिन्ह व मानपत्र देऊन 'हवेली वारकरी भूषण पुरस्कार २०२६' प्रदान करण्यात आला. पुरस्कार स्वीकारताना उपस्थित वारकरी बांधवांनी टाळ-मृदुंगाच्या गजरात आनंदोत्सव साजरा केला.

यावेळी मान्यवरांनी आपल्या मनोगतात सांगितले की, आनंद महाराज तांबे यांनी कीर्तन, प्रवचन, गायन आणि संत वाङ्मय प्रचाराच्या माध्यमातून समाजात अध्यात्मासोबत सामाजिक प्रबोधनाचे मोठे कार्य उभे केले आहे. व्यसनमुक्ती, अंधश्रद्धा निर्मूलन, राष्ट्रप्रेम, स्त्री सन्मान आणि स्वच्छता अभियान यांसारख्या विषयांवर त्यांनी सातत्याने जनजागृती केली आहे. वारकरी परंपरा आणि संत विचार पुढील पिढीपर्यंत पोहोचविण्याचे त्यांचे कार्य प्रेरणादायी असल्याचे मत उपस्थितांनी व्यक्त केले. या सोहळ्यास सिद्ध सद्गुरु शांतिनाथजी महाराज, श्रीक्षेत्र पंढरपूर यांचे आशीर्वाद लाभले. तसेच संत तुकाराम महाराज संस्थान देहू, धर्मवीर संभाजी महाराज मंदिर तुळापूर, श्रीराम मंदिर देवस्थान उरुळी कांचन, श्री वाघेश्वर महाराज मंदिर वाघोली यांसह विविध धार्मिक संस्थांचे सहकार्य लाभले. समस्त ग्रामस्थ श्रीक्षेत्र थेऊर, चिंतामणी भजनी मंडळ आणि महातारी आई भजनी मंडळ यांच्या संयुक्त विद्यमाने कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. वारकरी परंपरेचे जतन, संत विचारांचा प्रचार आणि समाजात ऐक्याचा संदेश देणारा हा भक्तिमय सोहळा ऐतिहासिक ठरल्याची भावना उपस्थित वारकरी बांधवांनी व्यक्त केली



## साने संगीत लोककला मंच ऊरूळी कांचन पुणे यांना संगीत कलेचा राज्यस्तरीय पुरस्कार प्रदान

अखिल भारतीय मराठी साहित्य परिषद, कला गोविंद शिक्षण प्रसारक मंडळ व पोलिस मित्र संघ महाराष्ट्र राज्य यांच्या संयुक्त विद्यमाने रविवार दिनांक १०/ ५/२०२६ रोजी सकाळी १० वाजता आठवे कवी संमेलन, पुस्तक प्रकाशन व पुरस्कार वितरण सोहळा २०२६ पुण्यातील ऊरूळी कांचन येथील महात्मा गांधी विद्यालय रविंद्र कला मंदिर येथे पार पडला. कवी संमेलनाचे अध्यक्षस्थान म्हणून राष्ट्रपती पोलीस पदक विजेते व अभिनेते, सुप्रसिद्ध कवी श्री सिताराम नरके यांनी भुषविले. कार्यक्रमाची सुरुवात दीपप्रज्वलनाने व महात्मा फुले व सावित्रीबाई फुले या महामानवांच्या प्रतिमेचे पूजन करून करण्यात आली. महात्मा गांधी सर्वोदय संघाचे सचिव श्री सोपान (बापू) कांचन विश्वस्त श्री महादेव कांचन , राजाराम कांचन जेष्ठ साहित्यिक श्री सुर्यकांत नामुगडे सर शिक्षण व क्रीडा जि. प . पुणे सदस्य सौ सुरेखा हरगुडे महात्मा गांधी विद्यालय ऊरूळी कांचन या विद्यालयाचे प्राचार्य श्री भरत भोसले कवी संगीतकार श्री सतीश कांबळे इत्यादी मान्यवर उपस्थित होते. कार्यक्रमाची सुरुवात स्वागत गीताने झाली. स्वागत गीताचे सादरीकरण साने संगीत क्लासेसचे विद्यार्थ्यांनी केले. गीता बरोबरच अभंग, गवळण, छत्रपती शिवाजी महाराजांचा पोवाडा, मराठी व हिंदी गाणी उत्कृष्ट सादर केली. संस्कृती अंधारे, सोनाली सुकाळ, संकेत खंडागळे, आदित्य लोखंडे, वैष्णवी साळूंखे, आरोही साळूंखे, श्रीशा काकडे, काळूराम जाधव, सुयश घनवट, हर्षद बोबडे, या विद्यार्थ्यांनी गायन वादन संगीत कलेचे उत्कृष्ट सादरीकरण केले म्हणून त्यांना सन्मानपत्र देऊन गौरविण्यात आले. उपस्थित कवींनी स्वरचित रचलेल्या कविता सादर केल्या. कवी संमेलनाचे औचित्य साधून संगीत क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी केल्याबद्दल श्री शिवराज साने सर यांना संगीत रत्न पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. श्री शिवराज साने यांनी व्यसन मुक्ती, अंधश्रद्धा निर्मूलन स्त्री भ्रूणहत्या रोखण्यासाठी कार्यक्रम, आरोग्य, हुंडाबंदी असे समाज प्रबोधन करणे लोकगीते,भारूडे, महापुरुषांच्या कार्याचा गीतातून गुणगौरव करून समाज प्रबोधन करण्याचे काम अविरतपणे केले.त्यांच्या कार्याची दखल घेऊन त्यांना उत्कृष्ट संगीतकार पुरस्कार देऊन गौरविण्यात आले आहे. कार्यक्रमाचे आयोजन अखिल भारतीय मराठी साहित्य परिषद पुणे जिल्हाध्यक्ष व पोलिस मित्र संघ महाराष्ट्र राज्याचे विभागीय अध्यक्ष श्री सुरेश वाळेकर यांनी केले तर सुत्रसंचलन अँड उमाकांत अदमाने यांनी केले.

समाजसत्ता

■ वर्षे १६ वे ■ अंक ३६ ■ पुणे, सोमवार, दि. ११ मे ते १७ मे २०२६ 

## संपादकीय

# इंधन बचतीसाठी टू व्हीलर वापर

चर राज्यांच्या निवडणुका पार पडल्या. यानंतर देशात पेट्रोलच्या किमतींमध्ये तीन रुपयांनी वाढ झाली. देशाचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशवासीयांना इंधन बचतीचा संदेश दिला. त्यात दोन कार असताना एकच कारचा उपयोग करावा, दोन मोटरसायकल असतील तर एकच मोटरसायकलचा वापर करावा, ज्यांच्याकडे ई कार असतील, ई बाइक असतील त्यांनी त्यांचा वापर करावा असा संदेश पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी देशवासीयांना दिला. त्यानंतर जळगावच्या महापौर म्हणजे प्रथम नागरिक दीपमाला काळे यांनी त्यांच्या सरकारी वाहना व्यतिरिक्त टू व्हीलर वर ऑफिसला यायला सुरुवात केली. त्याचप्रमाणे दोन सरकारी वाहनांपैकी एक वाहन वापरणे बंद केले आणि महापालिका कर्मचाऱ्यांना आणि अधिकाऱ्यांनाही सूचना केली की, ज्यांच्याकडे ई - बायिक आहे त्यांनी ई-बाईकवर कार्यालयात यावे तसेच दोन जणांनी मिळून एका वाहनात वर कार्यालयात येण्याचे शक्य असेल तर तसे करावे. शेअरिंग वाहनाद्वारे दोन जणांनी मिळून एक वाहन वापरणे चालू करावे, त्याचबरोबर आठवड्यातून एकदा वाहनाशिवाय कार्यालयात यावे. म्हणजे आठवड्याला बुधवारी 'नो व्हेईकल डे' पाळावा, असे महापौर यांनी सांगितले. इंधनाची बचत करण्यासाठी महापौरांच्या या सूचना अत्यंत योग्य आहेत. कारण पेट्रोल आणि डिझेलच्या किमती प्रति लिटर तीन रुपयांनी महागल्या आहेत. त्याचबरोबर इंधनाची टंचाई निर्माण होण्याऐवजी त्याला आळा घालण्यासाठी सदर इंधन बचतीचा उपयोग करणे अत्यंत महत्त्वाचे आहे. महापौर आपल्या ई टू व्हीलरने जेव्हा कार्यालयाकडे निघाल्या तेव्हा सर्वजण त्यांना पाहण्यासाठी उत्सुक होते. पहिले एक दोन दिवस हा प्रकार होईल, त्यानंतर कोण कुणाकडे पाहणार सुद्धा नाही. महापौरांच्या इंधन बचतीच्या सूचनेचा काही अंशी वापर जर महापालिकेतील कर्मचाऱ्यांकडून करता आला तर फार मोठी उपलब्धी होईल असे म्हणता येईल. त्याचबरोबर जळगावचे प्रथम नागरिक आपल्या बाईकवर कार्यालयात ये जा करत असल्याचे पाहून शहरातील काही नागरिकांनी त्यांच्या आदर्श घेतला तर फार मोठी उपलब्ध झाली असे म्हणता येईल. हा संदेश फक्त जळगावकरांनाच असेल असे नाही तर त्याचा परिणाम आजूबाजूच्या तालुक्यांमध्ये म्हणजे जिल्ह्यातील इतर गावांमध्ये होऊन जिल्ह्यातील काही लोकांनी जरी त्याचे अनुकरण केले तरी चांगला परिणाम होईल. एकंदरीत एका संदेशाने जिल्ह्यात सकारात्मक परिणाम होईल आणि त्याचा इंधन बचतीवर परिणाम होईल यात शंका नाही.

इंधन बचतीच्या संदेशाबरोबरच मोदींनी आणखी काही संदेश दिले आहेत. शक्यतोवर परदेशात प्रवास करण्याचे टाळा. म्हणजे परदेशात जाण्यावर बंदी घाला. आवश्यक असेल तेथेच परदेश प्रवास करा. म्हणजे परदेशात पर्यटन करणे टाळा. महत्त्वाचा प्रदेश प्रवास असेल तरच तो करा, असा संदेश मोदींनी दिला आणि तो संदेश सुद्धा महत्त्वाचा आहे. त्याचबरोबर विमान प्रवास करणे शक्यतो टाळा. तसेच जेथे रेल्वे किंवा सार्वजनिक वाहनावर प्रवेश करणे शक्य आहे तेथे सार्वजनिक वाहनाने प्रवास करावा. यातून इंधनात फार मोठी बचत होऊ शकेल. परदेश प्रवास टाळण्याच्या सूचना पंतप्रधानांनी केल्या असल्या तरी राजकीय लोकांवर त्याचा कितपत परिणाम होईल ? हे सांगता येणार नाही. राजकारणी लोकांना स्वतःच्या खिशातून पैसे देऊन प्रवास करायचा नसतो. त्यामुळे राजकारणी लोकांच्या प्रवासावर बंदी घालणे आवश्यक आहे. तसेच राजकारणी लोक आणि सरकारी अधिकाऱ्यांच्या वाहन वापरावर कटोती करण्याची गरज आहे आणि ती करण्याची आवश्यकता देखील आहे. राजकारण्यांकडे आणि सरकारी अधिकाऱ्यांकडे शासकीय वाहना व्यतिरिक्त दोन वाहने त्यांच्या घरी असतात. त्या वाहनांवर सुद्धा बंदी आणणे आवश्यक आहे एकंदरीत देशाची अर्थव्यवस्था डळमळीत असल्याचे चित्र असून त्यासाठी आता सर्वांवर बंदी आणणे आवश्यक आहे. पांढरपेशा समाजावर अथवा समाजातील मध्यमवर्गावरच बंदी आणण्यापेक्षा जे बडे बडे व्यापारी उद्योगपती आहेत, त्यांच्यावर सुद्धा इंधन बचतीची काटकसर करण्याची गरज आहे. ती केली पाहिजे असे आम्हाला वाटते. सरकारी कार्यालयांमध्ये अथवा सार्वजनिक ठिकाणी वातानुकूलित वापरावर थोडे बंधन आणणे आवश्यक आहे. ज्या कार्यालयात कुणीही नसते तेथे वातानुकूलित मशीन चालू असतात. त्यावर बंदी घालणे आवश्यक आहे. तरच इंधन बचत होईल अन्यथा आंधळं जळतंय आणि कुत्र पीठ खातय अशी अवस्था व्हायला नको... !

# पुणे-मुंबई : सातवाहनांच्या पायवाटेपासून 'कनेक्टिंग लिंक'पर्यंतचा प्रवास

दख्खनच्या पठाराला कोकणाच्या किनाऱ्यापासून वेगळं करणारी सह्याद्री पर्वतरांग ही जणू निसर्गाने उभी केलेली अभेद्य भिंतच. पण माणूस भिंतींना भेदण्यासाठीच मार्ग शोधत आला आहे. या भिंतीला भेदून तयार झालेले घाट म्हणजे त्या जिद्दीचा साक्षीदार. त्यापैकी भोर घाट हा सर्वात महत्त्वाचा, ऐतिहासिक आणि सतत वापरात राहिलेला मार्ग. आज आपण काही तासांत पार करणारा पुणे-मुंबई प्रवास, पूर्वी दिवसांच्या प्रवासातून पूर्ण होत असे. या प्रवासाची कथा म्हणजे हजारो वर्षांच्या बदलत्या काळाची, बदलत्या तंत्रज्ञानाची आणि बदलत्या गरजांची कहाणी आहे.

### सातवाहन काल : व्यापार, संस्कृती आणि घाटवाटा

सातवाहन कालात सह्याद्री ओलांडण्याची गरज प्रामुख्याने व्यापारामुळे निर्माण झाली. कोकण किनाऱ्यावरील बंदरे.. सोपारा, कल्याण, चौल ही परदेशी व्यापाऱ्यांसाठीची प्रवेशद्वार होती. रोमन साम्राज्याशीही व्यापार होत असल्याचे पुरावे आजही जुन्नर, तेर इथे सापडल्याचे पुरावे तिथल्या वस्तूसंग्रहालयात पाहायला मिळतात. या बंदरांवर उतरलेला माल दख्खनमध्ये पोहोचवण्यासाठी घाटवाटा तयार झाल्या. त्या पायवाटा होत्या... रस्ता नव्हता; पण मार्ग होता.

व्यापारी काफिले, जनावरे, आणि माणसे या घाटातून प्रवास करत असत. या प्रवासात धोके होते... वन्य प्राणी, दरोडेखोर, आणि कठीण भूप्रदेश. तरीही हा मार्ग जिवंत राहिला कारण तो गरजेचा होता. या मार्गातून केवळ वस्तूंची देवाणघेवाण झाली नाही, तर संस्कृती, भाषा, धर्म आणि विचारही एका प्रदेशातून दुसऱ्या प्रदेशात पोहोचला. सह्याद्री हा अडथळा नसून, संवादाचा पूल ठरला.

### मध्ययुगीन सत्ताकाळ

यादव, बहामनी आणि आदिलशाही सत्तांच्या काळात या घाटमार्गांचा वापर वाढला. सत्तेला विस्तार हवा होता, आणि त्यासाठी जलद संपर्क आवश्यक होता. घाटवाटा अधिक वापरात आल्या, काही प्रमाणात सुधारल्या गेल्या. पण या मार्गाला खऱ्या अर्थाने सामरिक धार मिळाली ती छत्रपती शिवाजी महाराज यांच्या काळात.

सह्याद्रीच्या किल्ल्यांच्या जाळ्यातून मराठा सत्तेने घाटांवर नियंत्रण मिळवलं. लोहगड किल्ला आणि विसापूर किल्ला हे किल्ले भोर घाटावर नजर ठेवून होते. घाटातून होणारी प्रत्येक हालचाल या किल्ल्यांच्या देखरेखीखाली होती. त्यामुळे हा मार्ग केवळ व्यापाराचा राहिला नाही; तो संरक्षण, गुप्त हालचाली आणि युद्धनीतीचा महत्त्वाचा भाग बनला.

### ब्रिटिश कालखंड : पायवाट ते दगडी रस्ता

१८१८ मध्ये इंग्रजांनी महाराष्ट्रावर सत्ता प्रस्थापित केल्यानंतर त्यांच्या दृष्टीने मुंबई-पुणे संपर्क अत्यंत महत्त्वाचा ठरला. व्यापार, प्रशासन आणि लष्करी हालचालींसाठी एक सक्षम रस्ता आवश्यक होता. त्यामुळे १८३० च्या दशकात भोर घाटात दगडी रस्ता बांधण्याचे काम हाती घेण्यात आले. हा रस्ता घोडागाडी आणि बैलगाडी चालेल असा होता. पुढे घाटातील वळणं सांभाळून, उतार-चढाव नियंत्रित करत हा रस्ता उभारण्यात आला. हा टप्पा म्हणजे पुणे-मुंबई मार्गाचा आधुनिक जन्म. हजारो वर्षांच्या पायवाटांना आता एक ठोस, अभियांत्रिकी पायाभूत सुविधा मिळाली.

### रेल्वेचा चमत्कार : सह्याद्रीतून लोहमार्ग

ब्रिटिशांनी पुढे एक पाऊल टाकत 'ग्रेट इंडियन पेनीनसुला रेल्वे' (महान भारतीय द्वीपकल्प रेल्वे) मार्फत भोर घाटातून रेल्वेमार्ग उभारला. १८६३ मध्ये हा मार्ग सुरू झाला. हे काम त्याकाळी अत्यंत कठीण होते... डोंगर फोडणे, बोगदे खोदणे, पूल बांधणे... पण यामुळे सह्याद्री ओलांडण्याची संकल्पना बदलली. प्रवास जलद, नियमित आणि सुरक्षित झाला.

### स्वातंत्र्यानंतर : राष्ट्रीय महामार्ग ते द्रुतगती मार्ग

स्वातंत्र्यानंतर भारताने या मार्गाचा विकास पुढे चालू ठेवला. पुणे-मुंबई मार्ग राष्ट्रीय महामार्गात विकसित झाला. पण वाढत्या वाहतुकीमुळे घाटातील वळणं आणि अपघातांची समस्या वाढू लागली. यावर उपाय म्हणून २००२ मध्ये मुंबई-पुणे द्रुतगती मार्ग सुरू करण्यात आला. हा भारतातील पहिला सहा पदरी द्रुतगती मार्ग ठरला. प्रवासाचा वेळ मोठ्या प्रमाणात कमी झाला आणि वेगाला नवे परिमाण मिळाले. पुण्याच्या विकासासाठीही मोठे सकारात्मक परिणाम झाले.

### औद्योगिक आणि आयटी विकासाला मोठी चालना

पूर्वी मुंबई आणि पुणे यांच्यातील प्रवास वेळखाऊ होता. द्रुतगती मार्गामुळे हा वेळ मोठ्या प्रमाणात कमी झाला. त्यामुळे पुणे हे मुंबईला पर्यायी औद्योगिक आणि माहिती तंत्रज्ञान केंद्र म्हणून वेगाने पुढे आले. हिंजवडी आयटी पार्क, तळवडे, खराडी, मगरपट्टा, चाकण, रंजनगाव यांसारख्या भागांचा विकास झपाट्याने झाला. अनेक बहुराष्ट्रीय कंपन्यांनी पुण्यात गुंतवणूक केली.

### पुणे-मुंबई आर्थिक पट्टा

द्रुतगती मार्गामुळे पुणे आणि मुंबई यांच्यातील आर्थिक संबंध अधिक मजबूत झाले. अनेक व्यावसायिक मुंबईत बैठक घेऊन त्याच दिवशी पुण्यात परत येऊ लागले. लॉजिस्टिक्स, वेअरहाउसिंग, वाहतूक आणि सेवा क्षेत्राचा विस्तार झाला. लोणावळा, खोपोली, तळेगाव या मधल्या पट्ट्यातही आर्थिक हालचाली वाढल्या.

### रिअल इस्टेटचा मोठा विस्तार

द्रुतगती मार्गानंतर पुण्यातील बांधकाम व्यवसायाने प्रचंड वेग घेतला. हिंजवडी, वाकड, बाणेर, पिंपरी-चिंचवड, तळेगाव, रावेत, चाकण या भागांमध्ये मोठ्या प्रमाणावर गृहनिर्माण प्रकल्प उभे राहिले. मुंबईत काम करणाऱ्या काही लोकांनीही पुण्यात स्थायिक होण्यास सुरुवात केली.

### पर्यटन आणि विकेंड संस्कृती वाढली

लोणावळा, खंडाळा, मावळ परिसर हा विकेंड पर्यटनाचा प्रमुख पट्टा बनला. पुणे आणि मुंबईतील लोकांचा परस्पर प्रवास वाढला. रिसॉर्ट्स, हॉटेल्स, फूड मॉल्स, ॲडव्हेंचर पर्यटन यांचा व्यवसाय वाढला.

### शिक्षण क्षेत्राचा विस्तार

पुणे आधीपासून शिक्षणाचे केंद्र होते; पण द्रुतगती मार्गामुळे देशभरातील विद्यार्थ्यांसाठी पुणे अधिक सहज उपलब्ध झाले. खासगी विद्यापीठे, अभियांत्रिकी, व्यवस्थापन आणि आयटी शिक्षण संस्थांचा विस्तार झाला.

### पिंपरी-चिंचवडचा वेगवान शहरी विस्तार

ऑटोमोबाईल उद्योग आणि द्रुतगती मार्ग यांचा एकत्रित परिणाम म्हणून पिंपरी-चिंचवड महानगराचा झपाट्याने विस्तार झाला. वाहन उद्योग, पुरवठा साखळी आणि पूरक उद्योग मोठ्या प्रमाणावर वाढले.

### पुण्याची जीवनशैली बदलली

द्रुतगती मार्गानंतर पुणे अधिक मेट्रो शहर म्हणून विकसित होऊ लागले. मॉल संस्कृती, कॉर्पोरेट जीवनशैली, आयटी प्रोफेशनल्सची वाढ, उच्च उत्पन्न गट, नवीन टाउनशिप्स यामुळे शहराचा चेहरामोहरा बदलला

### 'कनेक्टिंग लिंक' : आधुनिक अभियांत्रिकीचा शिखरबिंदू

तरीही खंडाळा-लोणावळा घाटातील काही भाग अपघातप्रवण आणि वेळखाऊ राहिले. याच समस्येवर उपाय म्हणून 'कनेक्टिंग (मिसिंग ) लिंक' प्रकल्पाची संकल्पना पुढे आली. खोपोली ते कुसगाव या दरम्यानचे अंतर सुमारे ६ किलोमीटरने कमी करणे आणि प्रवासाचा वेळ सुमारे ३० मिनिटांनी घटवणे... हा या प्रकल्पाचा मुख्य उद्देश. सुमारे ६,६९५ कोटी रुपयांच्या खर्चातून हा प्रकल्प उभारण्यात आला. या महत्त्वाकांक्षी प्रकल्पाचे लोकार्पण देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते आणि एकनाथ शिंदे, सुनेत्रा अजित पवार आणि मान्यवर मंत्री, सचिव यांच्या उपस्थितीत १ मे रोजी करण्यात आले. महाराष्ट्र दिनाच्या निमित्ताने हा मार्ग वाहनांसाठी खुला करण्यात आला, आणि सह्याद्री ओलांडण्याच्या इतिहासात एक नवा अध्याय सुरू झाला.

### पूल आणि बोगदे : अभियांत्रिकी कमाल

या प्रकल्पात दोन समांतर बोगदे आणि दोन उंच पूल उभारण्यात आले आहेत. ८.९२ किलोमीटर लांबीचा बोगदा लोणावळा तलावाच्या सुमारे १८० मीटर खाली खोदण्यात आला आहे. तसेच १८४ मीटर उंच केबल-आधारित पूल (तारांच्या आधारावर उभारलेला पूल) हा अभियांत्रिकी कौशल्याचा उत्कृष्ट नमुना आहे. या प्रकल्पामुळे घाटातील धोकादायक वळणं टाळली जातील. वाहतुकीचा अखंड प्रवाह राखला जाईल. इंधनाची बचत, वेळेची बचत आणि अपघातांमध्ये घट... या सर्व बाबींचा थेट फायदा प्रवाशांना होणार आहे. अत्याधुनिक अग्निसुरक्षा, हवाप्रवाह व्यवस्था आणि डिजिटल नियंत्रण प्रणाली (संगणकीय नियंत्रण व्यवस्था) यामुळे हा मार्ग अधिक सुरक्षित बनला आहे.

### महाकाय प्रकल्पांची उभारणी : आधुनिक तंत्रज्ञान आणि आव्हानांची शर्यत

महाराष्ट्रातील पायाभूत सुविधांचा चेहरामोहरा बदलणाऱ्या समृद्धी महामार्ग आणि मुंबई-पुणे मिसिंग लिंकसारख्या प्रकल्पांची उभारणी करणे हे केवळ इंजिनिअरिंगचे (अभियांत्रिकीचे) काम नसून ते एक मोठे प्रशासकीय आणि तांत्रिक आव्हान होते. हे प्रकल्प साकारताना निसर्गाची प्रतिकूलता आणि तांत्रिक क्लिष्टता यांचा मोठा सामना करावा लागल्याचे महाराष्ट्र राज्य रस्ते विकास महामंडळाचे उपाध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक अनिलकुमार गायकवाड यांनी अधोरेखित केले आहे.

### बोगद्यांचे जाळे आणि सुरक्षिततेचे कवच

बोगद्यात केवळ रस्ता तयार करणे पुरेसे नव्हते, तर प्रवाशांच्या सुरक्षिततेसाठी तिथे एक स्वतंत्र यंत्रणा कार्यरत असते. बोगद्यात नैसर्गिक सूर्यप्रकाश नसतो आणि हवेची हालचाल मर्यादित असते. अशा वेळी, वाहनांच्या धुरामुळे कार्बन मोनॉक्साईडचे प्रमाण वाढू नये म्हणून तिथे शक्तिशाली 'जेट फॅन्स' (वेगवान हवेचे पंखे) बसवले जातात. तांत्रिक बिघाडामुळे एखादी गाडी बोगद्यात बंद पडली, तर सुरक्षिततेसाठी दर ३०० ते ५०० मीटरवर 'क्रॉस पॅसेज' (आंतरजोड मार्ग) आणि 'इमर्जन्सी पार्किंग बे' (आपत्कालीन वाहन थांबा) दिलेले असतात. 'ऑटोमॅटिक इन्सिडेंट डिटेक्शन सिस्टिम' (स्वयंचलित घटना शोध प्रणाली) मुळे एखादे वाहन थांबल्यास नियंत्रण कक्षाला तातडीने संदेश जातो, ज्यामुळे भ्रमणध्वनी सेवा नसतानाही मदत पोहोचू शकते.

### वाऱ्याचा वेग आणि केबल-स्टेड ब्रिजचे आव्हान

कनेक्टिंग लिंक प्रकल्पांतर्गत लोणावळ्याजवळील दरीत जो भव्य केबल-स्टेड ब्रिज (ताराधारित पूल) उभारला गेला, तिथे सर्वात मोठे आव्हान वाऱ्याच्या वेगाचे होते. १८४ मीटर उंचीचे पायलान्स (आधारस्तंभ) आणि दरीतील प्रचंड वारा यामुळे पुलाच्या स्थिरतेवर परिणाम होऊ शकतो. हे लक्षात घेऊन, या पुलाचे डिझाइन (आराखडा) अशा प्रकारे करण्यात आले आहे की, ताशी शेकडो किलोमीटर वेगाने वाहणाऱ्या वाऱ्याचा दाब हा पूल सहज पेलू शकेल. या पुलाच्या पायाभरणीसाठी वापरण्यात आलेल्या एका 'फुटिंग'चे (पाया रचना) वजन तब्बल १०,००० टन आहे, जे या कामाच्या अवाढव्यतेची साक्ष देते.

### कामाची गती आणि सकारात्मक दृष्टीकोन

गायकवाड एक वृत्त वहिनीला दिलेल्या मुलाखतीत म्हणाले, भूसंपादनावेळी झालेला विरोध असो किंवा घाटातील कठीण भौगोलिक परिस्थिती, या सर्व आव्हानांवर मात करण्यासाठी केवळ तांत्रिक ज्ञान पुरेसे नसते, तर जोखीम घेण्याची क्षमता आणि सकारात्मक दृष्टीकोन आवश्यक असतो. आम्ही प्रतिकूलतेत संधी शोधली आणि त्यामुळेच आज महाराष्ट्र वेगवान रस्ते विकासाच्या जागतिक नकाशावर ठळकपणे दिसत आहे . त्यांच्या या बोलण्यातून हे काम किती आव्हानात्मक होते याची जाणीव होते.

### जगातील सर्वाधिक रुंद भूमिगत बोगदा आणि गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्ड

यशवंतराव चव्हाण द्रुतगती मार्गावरील कनेक्टिंग लिंक प्रकल्पातील बोगद्याची जगातील सर्वाधिक रुंद भूमिगत बोगदा म्हणून गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डमध्ये नोंद झाली आहे. याबाबतचे गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डच्या प्रतिनिधींनी जागतिक विक्रमाचे प्रमाणपत्र मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे सुपूर्द केले. यावेळी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री श्रीमती सुनेत्रा अजित पवार यांची प्रमुख उपस्थिती होती. गिनीज बुक ऑफ वर्ल्ड रेकॉर्डने या बोगद्याची रुंदी जगात सर्वाधिक २२.३३ मीटर अशी जाहीर केली. या प्रकल्पाच्या कामात अनेक आव्हानांचा सामना करावा लागला. कोविड-१९ महामारी, मुसळधार पाऊस, कठीण खडक, वन परवानग्या... तरीही अभियंते आणि कामगारांनी चिकाटीने हे काम पूर्ण केले. सातवाहनांच्या पायवाटेपासून सुरू झालेला हा प्रवास आज 'कनेक्टिंग (मिसिंग) लिंक'पर्यंत पोहोचला आहे. सह्याद्री तसाच आहे... बदलल्या आहेत त्या त्याला ओलांडण्याच्या पद्धती. हा मार्ग आजही केवळ प्रवासाचा नाही... तो इतिहास, वर्तमान आणि भविष्य यांना जोडणारा जिवंत दुवा आहे... मिसिंग लिंकचा नवा थरारक अध्याय नव्या महाराष्ट्राच्या घडणीतील महत्त्वाचे पान ठरणार आहे ..!!

मराठी साप्ताहिक समाज सत्ता के मुद्रक : राजेश सुकलाल धिवर तथा प्रकाशक : राजेश सुकलाल धिवर द्वारा के पक्ष में श्री समर्थ प्रिंटर्स, आप्पा बळवंत चौक, प्रभात थिएटर के पास, ५३५, शनिवार पेठ, पुणे ४११०३० महाराष्ट्र से मुद्रित तथा बी-२१/५०३, सेक्टर १२, प्लॉट नं. बी-१, पी.एम.आर.डी.ए., भोसरी, पिंपरी चिंचवड कार्पोरेशन, ता. हवेली, जि. पुणे ४११०१८ महाराष्ट्र से प्रकाशित, संपादक राजेश सुकलाल धिवर
Mob.: 9049940157 E-Mail- samajsattagmail.com, RNI NO. M-HM-R/2009/28514 (सर्व वादविवाद पुणे न्यायालयाच्या कक्षेत)

# पिंपरी - चिंचवड परिसर

■ वर्षे १६ वे ■ अंक ३६ ■ पुणे, सोमवार, दि. ११ मे ते १७ मे २०२६







## ऊर्जा बचत धोरणाबाबत महापालिकेची महत्त्वपूर्ण बैठक संपन्न

■ **ऊर्जा बचतीच्या प्रकल्पांसाठी निधी संरचना आणि अंमलबजावणीवर झाली चर्चा**

**पिंपरी :** महापालिकेच्या इमारतींमध्ये ऊर्जा बचतीसाठी राबविण्यात येणारे उपक्रम हे केवळ अभ्यास, अहवाल आणि सादरीकरणांपुरते मर्यादित राहता कामा नयेत. प्रत्यक्ष अंमलबजावणीतून वीज वापरात लक्षणीय बचत आणि कार्यक्षम ऊर्जा व्यवस्थापनाचे ठोस परिणाम दिसून येणे गरजेचे आहे. त्यासाठी वेळबद्ध कृती आराखडा तयार करून ऊर्जा कार्यक्षम तंत्रज्ञानाचा प्रभावी वापर करणे आवश्यक आहे. पर्यावरण संवर्धन, आर्थिक बचत आणि शाश्वत विकास या तिन्ही उद्दिष्टांचा समतोल साधणारी कार्यपद्धती महापालिकेने स्वीकारणे आवश्यक असल्याचे प्रतिपादन आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी केले.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या इमारतींमध्ये ऊर्जा कार्यक्षम तंत्रज्ञानाचा अवलंब करून वीज बचत, खर्च नियंत्रण आणि पर्यावरण संवर्धन साध्य करण्याच्या उद्देशाने ऊर्जा बचत धोरणांतर्गत विविध उपाययोजनांबाबत महत्त्वपूर्ण बैठक पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय भवनात संपन्न झाली. या बैठकीत महापालिकेच्या विविध प्रशासकीय इमारतींमधील एसी यंत्रणा, वॉटर पंप तसेच अन्य विद्युत उपकरणांच्या ऊर्जा वापराचे व्यवस्थापन अधिक परिणामकारक करण्यासाठी राबविण्यात येणाऱ्या उपक्रमांवर सविस्तर चर्चा करण्यात आली. यावेळी आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी बोलत होते.

या बैठकीस अतिरिक्त आयुक्त कुलदीप जंगम, मुख्य अभियंता संजय कुलकर्णी, सह शहर अभियंता अजय सूर्यवंशी, उप आयुक्त अण्णा बोदडे, कार्यकारी अभियंता संतोष दुर्गे तसेच एशियन डेव्हलपमेंट बँक (ए.डी.बी), अलांयन्स् फॉर एनर्जी इफिशिएंट इकॉनॉमी (ए.इ.इ.इ) आणि कौन्सिल ऑन एनर्जी, एन्व्हायरोमेंट अँड वॉटर (सी.इ.इ.डब्ल्यू) या संस्थांचे प्रतिनिधी व्हिडीओ कॉन्फरन्सिंगद्वारे उपस्थित होते.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेने अलांयन्स् फॉर एनर्जी इफिशिएंट इकॉनॉमी (ए.इ.इ.इ) सोबत यापूर्वीच सामंजस्य करार केला असून त्या अंतर्गत अलांयन्स् फॉर एनर्जी इफिशिएंट इकॉनॉमी (ए.इ.इ.इ), एशियन डेव्हलपमेंट बँक (ए.डी.बी) आणि कौन्सिल ऑन एनर्जी, एन्व्हायरोमेंट अँड वॉटर (सी.इ.इ.डब्ल्यू) यांच्या संयुक्त विद्यमाने ऊर्जा कार्यक्षमतेसंदर्भातील अभ्यास आणि नियोजन प्रक्रिया सुरू आहे.

या प्रकल्पांतर्गत महापालिकेच्या ऊर्जा वापराचे विश्लेषण, ऊर्जा बचतीच्या संधींचा शोध, आर्थिक व्यवहार्यता तसेच आवश्यक निधी संरचना याबाबत विविध टप्प्यांमध्ये काम करण्यात येत आहे. बैठकीमध्ये इन्सेप्शन रिपोर्ट, महापालिकेच्या वित्तीय स्थिती व ऊर्जा खर्च विश्लेषण अहवाल, प्राथमिक आर्थिक मॉडेल व व्यवसाय आराखडा, निधी संरचना अहवाल, प्री-फिजिबिलिटी स्टडी तसेच अंतिम आर्थिक मॉडेल आणि अंतिम प्री-फिजिबिलिटी स्टडी अहवाल या महत्त्वपूर्ण मुद्द्यांवर संगणकीय सादरीकरण करण्यात आले आणि त्यावर सविस्तर चर्चा करण्यात आली.

बैठकीत ऊर्जा बचत उपाययोजनांसाठी आवश्यक असलेल्या गुंतवणुकीचे विविध पर्याय, निधी उभारणीची संरचना तसेच अंमलबजावणीची कार्यपद्धती याबाबत चर्चा करण्यात आली. ऊर्जा कार्यक्षम प्रकल्पांची अंमलबजावणी करताना दीर्घकालीन शाश्वतता, आर्थिक व्यवहार्यता आणि प्रत्यक्ष ऊर्जा बचतीचे मोजमाप यावर विशेष भर देण्याच्या सूचना आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी यांनी दिल्या. तसेच केवळ अहवाल आणि अभ्यासापुरते मर्यादित न राहता प्रत्यक्ष अंमलबजावणीवर भर देऊन ऊर्जा बचतीची ठोस परिणामकारकता दिसून यावी, यासाठी वेळबद्ध नियोजन करण्याचे निर्देशही त्यांनी दिले.

## महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण नियामक मंडळ व वार्षिक सर्वसाधारण बैठक पुणे येथे संपन्न

■ **प्रलंबित सौर प्रकल्प जलद गतीने पूर्ण करा-मंत्री अतुल सावे**

**पुणे :** राज्यातील सर्व शासकीय कार्यालयामध्ये सौर सयंत्र प्राधान्याने पूर्ण करावे तसेच प्रलंबित सौर प्रकल्प जलद गतीने पूर्ण करावेत. याशिवाय सामाजिक उत्तर दायित्व निधीद्वारे सौर प्रकल्प पूर्ण करण्यावर भर द्यावा, असे निर्देश अपारंपरिक ऊर्जा मंत्री तथा महाऊर्जाचे अध्यक्ष अतुल सावे यांनी दिले.

महाराष्ट्र ऊर्जा विकास अभिकरण (महाऊर्जा) नियामक मंडळाची १०८ वी तसेच ३१ वी वार्षिक सर्वसाधारण बैठक आज पुणे येथील महाऊर्जा भवन येते पार पडली. यावेळी राज्यमंत्री मेघना साकोरे बोर्डीकर, महाऊर्जा महासंचालक ओमप्रकाश बकोरिया, अतिरिक्त महासंचालक अरुण आनंदकर व सर्व विभागांचे महाव्यवस्थापक , उपसंचालक लेखा व इतर अधिकारी उपस्थित होते.

## छत्रपती संभाजी महाराज यांनी स्वराज्याच्या रक्षणासाठी दिलेले बलिदान आजच्या पिढीसाठी प्रेरणादायी - महापौर रवि लांडगे




■ **पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने छत्रपती संभाजी महाराज जयंती उत्साहात साजरी...**

**पिंपरी -** छत्रपती संभाजी महाराज हे अद्वितीय शौर्य आणि राष्ट्रनिष्ठेचे साक्षात प्रतीक होते. अत्यंत प्रतिकूल परिस्थितीतही त्यांनी स्वराज्याच्या रक्षणासाठी दिलेले बलिदान हे आजच्या पिढीसाठी अत्यंत प्रेरणादायी आहे. त्यांच्या विचारांमधून राष्ट्रप्रेम, कर्तव्यनिष्ठा आणि अन्यायाविरोधात लढण्याची प्रेरणा मिळते तसेच त्यांच्या जयंतीनिमित्त आपण सर्वांनी त्यांच्या कार्याचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून राष्ट्रहितासाठी योगदान देण्याचा संकल्प करावा, असे प्रतिपादन महापौर रवि लांडगे यांनी केले.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या वतीने स्वराज्यलक्षक छत्रपती संभाजी महाराज यांची जयंती उत्साहात साजरी करण्यात आली.पिंपरी येथील मुख्य प्रशासकीय भवनातील त्यांच्या प्रतिमेस तसेच चिंचवड येथील बर्ड व्हॅली उद्यानातील शिल्पास महापौर रवि लांडगे यांच्या हस्ते पुष्पहार अर्पण करून अभिवादन करण्यात आले, त्यावेळी ते बोलत होते.

यावेळी उपमहापौर शर्मिला बाबर, नगरसदस्य तुषार हिंगे, कुशाग्र कदम, अनुराधा गोरखे, सुप्रिया चांदगुडे, रिटा सानप, अतिरिक्त आयुक्त विक्रांत बगाडे, उप आयुक्त अण्णा बोदडे, विशेष अधिकारी किरण गायकवाड, जनता संपर्क अधिकारी प्रफुल्ल पुराणिक,माजी नगरसदस्य मारूती भापकर,सामाजिक कार्यकर्ते काशिनाथ नखाते,आबासाहेब ढवळे,वैभव जाधव,जीवन बोऱ्हाडे,सागर तापकीर,जितेंद्र छाबडा,संजय कुरबट्टी,हेमा पारिसकर, हेमलता वाडेकर तसेच महापालिका कर्मचारी उपस्थित होते. कार्यक्रमाचे सुत्रसंचालन प्रफुल्ल पुराणिक यांनी केले.

## पिंपरी चिंचवड क्रीडा क्षेत्रातही देशाला दिशा देणारे शहर ठरतेय - महापौर रवि लांडगे



■ **किंग मार्शल आर्ट्स संस्थेच्या खेळाडूंचा महापौर कार्यालयात गौरव; आंतरराष्ट्रीय स्तरावर पिंपरी-चिंचवडचा झेंडा उंचावल्याबद्दल कौतुक**

**पिंपरी :** पिंपरी चिंचवड हे केवळ औद्योगिक शहर नसून क्रीडा क्षेत्रातही देशाला दिशा देणारे शहर बनत आहे. आपल्या शहरातील खेळाडू आंतरराष्ट्रीय स्तरावर भारताचा तिरंगा अभिमानाने फडकवत आहेत, ही प्रत्येक नागरिकासाठी प्रेरणादायी बाब आहे. जयदेव म्हमाणे यांच्यासारख्या खेळाडूंमुळे शहरातील युवा पिढीला नवी ऊर्जा मिळत आहे. अशा खेळाडूंच्या पाठीशी महापालिका कायम ठामपणे उभी राहील, असे प्रतिपादन महापौर रवि लांडगे यांनी केले.

पिंपरी चिंचवड शहरातील क्रीडा क्षेत्रासाठी अभिमानाची बाब ठरलेल्या किंग मार्शल आर्ट्स संस्थेच्या विद्यार्थ्यांचा महापौर कार्यालयात महापौर रवि लांडगे यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. यावेळी ते बोलत होते. याप्रसंगी स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे,सामाजिक कार्यकर्ते नामदेवराव जाधव उपस्थित होते. खेळाडूंना भविष्यात राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर अधिक संधी उपलब्ध व्हाव्यात, यासाठी आवश्यक ते सर्व सहकार्य करण्याचे आश्वासनदेखील यावेळी महापौर रवि लांडगे यांनी दिले.

उत्तर प्रदेशमधील सहारनपूर येथे नुकत्याच भारत-नेपाळ यांच्यात पार पडलेल्या इंडियन इंटरग्रील चॅम्पियन आंतरराष्ट्रीय स्पर्धेत भारताकडून खेळताना थेरगाव येथील चार खेळाडूंनी उल्लेखनीय कामगिरी करत शहराचा गौरव वाढविला. यामध्ये जयदेव म्हमाणे यांनी सुवर्णपदक पटकावत विशेष यश संपादन केले. यापूर्वीही त्यांनी तब्बल ११ सुवर्णपदके जिंकून आपल्या सातत्यपूर्ण कामगिरीची छाप उमटवली आहे. त्यांच्या उल्लेखनीय यशाची दखल भारताचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनीदेखील घेतली असून, हे संपूर्ण पिंपरी-चिंचवड शहरासाठी अभिमानाचे क्षण असल्याचेही यावेळी नमूद करण्यात आले.

यावेळी स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे म्हणाले, 'खेळाडूंचे यश हे केवळ वैयक्तिक नसून संपूर्ण शहराचा सन्मान असतो. कठोर मेहनत, शिस्त आणि जिद्दीच्या जोरावर या विद्यार्थ्यांनी जागतिक स्तरावर पिंपरी चिंचवडचे नाव पोहोचवले आहे. भविष्यात अशा खेळाडूंना अधिक प्रोत्साहन व सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी प्रयत्न करण्यात येतील,' असे देखील त्यांनी सांगितले.

## 'महाज्योती'च्या गुणवंतांचे यूपीएससी निकालात 'शतक'

**नागपूर :** महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था, नागपूर (महाज्योती) ने राष्ट्रीय स्तरावरील प्रशासकीय सेवांच्या क्षेत्रात आपला दबदबा निर्माण करत एक इतिहास रचला आहे. केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या (यूपीएससी) वतीने जाहीर झालेल्या भारतीय वन सेवा परीक्षा २०२५ च्या अंतिम निकालात 'महाज्योती'कडून प्रशिक्षण व आर्थिक सहाय्य योजनेचा लाभ घेतलेल्या ८ विद्यार्थ्यांनी घवघवीत यश संपादन केले आहे. विशेष म्हणजे, या निकालासह 'महाज्योती'ने यूपीएससीच्या विविध परीक्षांमध्ये यश मिळवणाऱ्या आपल्या विद्यार्थ्यांचा 'शंभरी'चा आकडा पार केला असून, प्रशासकीय अधिकारी घडवणारी अग्रगण्य संस्था म्हणून आपला ठसा उमटवला आहे, अशी माहिती 'महाज्योती'चे व्यवस्थापकीय संचालक मिलिंद नारिंगे यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे दिली आहे.

### जाहिर नोटीस

मी, श्रीमती. शितल महेश शेवते, रा. ३४३, शिवशक्ती मित्रमंडळ, वानवडी गांव, पुणे ४११०४० येथे राहवयास असुन माझे पती कै. महेश रमेश शेवते हे दि. १०/१२/२०२५ रोजी पुणे येथे मयत झालेले आहेत त्यांचे नावे बजाज ऑटो ली या कंपनीची ३ चाकी ऑटो रीक्षा गाडी पासिंग नं. MH12KR2116 चासी नं. MD2-24-Z8GWB20197 इंजिन नं. 24ZWGB35444 असुन सदर माझे मयत पती यांचे नावे असलेली गाडी माझे नावे करावयाची आहे. सदर गाडी माझे मयत पती यांनी कोणास विक्री, गहाण, दान, लिज केली असल्यास त्याबाबतचे पुरावे सदरची नोटीस प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासुन १५ दिवसांचे आत कागदोपत्री खात्री पटविण्यासाठी खालील पत्यावर सादर करावीत १५ दिवसांचे आत कागदोपत्री पुरावे सादर न केल्यास सदरची गाडी निर्जोखीम आहे असु समजुन आर.टी.ओ. यांचेकडे सदरची गाडी माझे नावे करण्यात यावी करीता सदरची नोटीस आज दि. १८/०५/२०२६ रोजी सार्वजनिक प्रकाशित केली असे.

**संपर्क श्रीमती. मती. शितल महेश शेवते**
**३४३, शिवशक्ती मित्रमंडळ, वानवडी गांव, पुणे ४११०४०**
**मो.नं. ७०५७५९५९४०**

### जाहिर नोटीस

मी, श्रीमती.मनिषा सदानंद करमळकर, रा. राही रिजेन्सी, डी बिल्डींग, २ रा मजला, सदनिका क्र. १६, नऱ्हे रोड, बॅक ऑफ महाराष्ट्र जवळ, पुणे ४११०४१ येथे राहवयास असुन माझे पती कै. सदानंद पुरुषोत्तम करमळकर हे दि. ०१/०९/२०२५ रोजी पुणे येथे मयत झालेले आहेत त्यांचे नावे टी.व्ही.एस या कंपनीची गाडी पासिंग नं. MH12ME2585S चासी नं. MD626BG42F1G00612 इंजिन नं. BG4GF1600878 असुन सदर माझे मयत पती यांचे नावे असलेली गाडी माझे नावे करावयाची आहे. सदर गाडी माझे मयत पती यांनी कोणास विक्री, गहाण, दान, लिज केली असल्यास त्याबाबतचे पुरावे सदरची नोटीस प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासुन १५ दिवसांचे आत कागदोपत्री खात्री पटविण्यासाठी खालील पत्यावर सादर करावीत १५ दिवसांचे आत कागदोपत्राी पुरावे सादर न केल्यास सदरची गाडी निर्जोखीम आहे असु समजुन आर.टी.ओ. यांचेकडे सदरची गाडी माझे नावे करण्यात यावी करीता सदरची नोटीस आज दि. १८/०५/२०२६ रोजी सार्वजनिक प्रकाशित केली असे.

**संपर्क श्रीमती. मनिषा सदानंद करमळकर**
**राही रिजेन्सी, डी बिल्डींग, २ रा मजला, सदनिका क्र. १६, नऱ्हे रोड, बॅक ऑफ महाराष्ट्र जवळ, पुणे ४११०४१ मो.नं. ९९२२९५९५४५**

समाजसत्ता ■ वर्षे १६ वे ■ अंक ३६ ■ पुणे, सोमवार, दि. ११ मे ते १७ मे २०२६


## 'पुणे ग्री हॅकॅथॉन-२०२६' पालकमंत्र्यांच्या हस्ते शुक्रवारी उद्घाटन-जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी

■ **मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत स्पर्धेचा समारोप**

**पुणे :** कृषी महाविद्यालय येथे १५ ते १७ मे २०२६ या कालावधीत आयोजित 'पुणे ग्री हॅकॅथॉन-२०२६' या स्पर्धेचे उद्घाटन राज्याच्या उपमुख्यमंत्री तथा जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्या हस्ते १५ मे रोजी सकाळी ११.३० वाजता करण्यात येणार आहे तर स्पर्धेचा समारोप आणि बक्षीस वितरण राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या हस्ते १७ मे २०२६ रोजी सकाळी ११.३० वाजता संपन्न होणार आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी जितेंद्र डूडी यांनी दिली आहे.

स्पर्धेसाठी उत्साहवर्धक प्रतिसाद लाभला असून यावर्षी एकूण १ हजार २९० अर्ज पोर्टलवर पुढील प्रॉब्लेम स्टेटमेंटमधील थीमकरीता प्राप्त झाले आहेत. यामध्ये मृदा आरोग्य आणि व्यवस्थापन, स्मार्ट जल व्यवस्थापन आणि ऑटोमेशन, शेती यांत्रिकीकरण (एआय आणि रोबोटिक्स), कृषी प्रक्रिया आणि मूल्य साखळी, अक्षय ऊर्जा आणि कृषी-कचरा व्यवस्थापन, पीक संरक्षण आणि कीड व्यवस्थापन, हवामान-अनुकूल आणि डिजिटल शेती, प्रभावी कृषी प्रशासनासाठी एआय, तंत्रज्ञान आधारित हस्तक्षेप प्रभावी आपत्ती व्यवस्थापन, पीक नुकसानीचे मूल्यांकन आणि भाकितासाठी एआय, तंत्रज्ञान, साधने समावेश आहे.

राज्यनिहाय प्राप्त झालेल्या स्पर्धकांची संख्या पुणे प्रमाणे आहे; महाराष्ट्र ८६७, तामिळनाडू २३१, तेलंगणा २८, कर्नाटक २३, उत्तर प्रदेश २२, राजस्थान व मध्य प्रदेश प्रत्येकी १८, गुजरात १७, पंजाब १६, दिल्ली ८, ओरिसा ७, अरुणाचल प्रदेश ६, केरळ ५, हरियाणा व आसाम प्रत्येकी ४, पश्चिम बंगाल, चंदीगड, बिहार व उत्तराखंड प्रत्येकी २, गोवा, छत्तीसगड, जम्मू-काश्मीर, हिमाचल प्रदेश व लडाख प्रत्येकी १ या प्रमाणे ऑनलाईन अर्ज प्राप्त झाले आहेत. या प्राप्त अर्जांची प्राथमिक छाननी ज्यूरी पॅनेलद्वारे करण्यात आली आहे. प्राथमिक छाननी मध्ये १२० नवकल्पना यांची निवड प्रत्यक्ष प्रदर्शनाकरिता करण्यात आली आहे. यामधून प्रत्येक प्रवर्गातून एक विजेता व उपविजेता यांची निवड ज्युरी पॅनेलमार्फत करण्यात येईल. विजेत्यास रुपये २५ लाख रुपये व उपविजेत्यास रुपये १५ लाख पारितोषिक देण्यात येणार आहे.

मागील वर्षी घेतलेल्या स्पर्धेचे परिणाम उत्साहवर्धक असून एकूण निवडलेल्या १६ पैकी १२ नवकल्पना, उत्पादने यांना कृषी विद्यापीठाकडून प्रमाणिकरण प्राप्त झाले आहे. यातील चार उत्पादनांची व्यापारी तत्त्वावर उत्पादन सुरू झाले असून उर्वरित विकसनाच्या प्रक्रियेत आहेत. तसेच यातील ४ उत्पादनांना शासनाच्या कृषी यांत्रिकीकरण योजनेअंतर्गत समाविष्ट करणेबाबत कार्यवाही सुरू आहे. या स्पर्धेच्या माध्यमातून नाविन्यपूर्ण कल्पना, उत्पादने यांना आकृष्ट करणे, सदर नव तंत्रज्ञांना योग्य व्यासपीठ व योग्य व्यवस्था निर्माण करणे या उद्देशाने या ग्री हॅकॅथॉनचे आयोजन करण्यात येत आहे, अशी माहिती जिल्हाधिकारी श्री. डुडी यांनी दिली आहे.

## उष्णतेच्या लाटेपासून कामगार व नागरिकांचे संरक्षण करण्यासाठी उपाययोजनांबाबत मार्गदर्शक सूचना निर्गमित-जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी

**पुणे :** राज्य शासनाकडून प्राप्त सूचनेनुसार भारतीय हवामान विभागाने जारी केलेल्या हंगामी उष्णतेच्या इशाऱ्यानुसार पुढील काही महिन्यांत सामान्यापेक्षा अधिक तापमान राहणार असल्याचे अवगत केले आहे, अशा अत्यंत तीव्र उष्णतेच्या लाटेच्या परिस्थितीत सर्वाधिक कामगार आणि मजूरांना त्रास होतो , उष्णतेच्या लाटेच्या प्रतिकूल परिणामांपासून त्यांच्या संरक्षणाच्यादृष्टीने बहु-क्षेत्रीय उपाययोजना मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात येत आहेत, अशी माहिती जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष जितेंद्र डुडी यांनी दिली आहे.

कामगार व उद्योग क्षेत्रासाठी : कामगारांचे कामाचे तास पुन्हा नियोजित करणे. विशेषतः दुपारच्या उष्णतेत काम टाळणे. आवश्यकतेनुसार कामाचा वेग कमी करण्याची परवानगी देणे, पुरेसे पिण्याचे पाणी, विश्रांती क्षेत्रे व थंडावा मिळेल अशी व्यवस्था करणे. आपत्कालीन बर्फ,पंखा व उष्णता प्रतिबंधक साहित्य उपलब्ध करुन देणे. आरोग्य विभागाशी समन्वय साधून कामगारांची नियमित आरोग्य तपासणी करणे.

कारखानेवखाणीव्यवस्थापनासाठी : कामगारांना सर्वाधिक उष्णतेच्या वेळेत विश्रांती देणे. दोन व्यक्तींच्या गटाने काम करण्याची व्यवस्था करणे. इलेक्ट्रोलाइट पूरक पेय उपलब्ध करुन देणे. कामगारांना उष्णतेच्या धोका व उपाययोनांबाबत जागरुक करणे.

विशेष लक्ष देण्याचे गट : बांधकाम कामगार, वीटभट्टी कामगार, रोजंदारी मजूर व असंघटीत क्षेत्रातील कामगाराच्या जनजागृतीसाठी पोस्टर, बॅनर व श्रमिक चौकांवर मोहिमा आयोजित करणे.

ग्रामसभा व सार्वजनिक कार्यक्रमांसाठी : उन्हाळ्यात सुरू असलेल्या ग्रामसभा व धार्मिक,सांस्कृतिक मिरवणुका यामध्ये आरोग्य कर्मचाऱ्यांची नियुक्त करुन आवश्यक उपचार साहित्य व उपाययोजना उपलब्ध कराव्यात. प्रक्रिया व कार्यक्रमांचे वेळापत्रक उष्णतेच्या उच्चांक काळात बदलण्याची शक्यता तपासावी. प्रत्येक ठराविक लोकसंख्येच्या गटासाठी थंडावा मिळेल अशी विश्रांती क्षेत्रे अनिवार्यपणे उभारावीत. यात्रांमध्ये पुरेसे पिण्याचे पाणी व इलेक्ट्रोलाइट पेय उपलब्ध करुन घ्यावे. जनजागृतीमध्ये स्थानिक पातळीवर पत्रके व माहिती फलकांचा आणि प्रसारमाध्यमांचा वापर करावा. प्रशासनाच्यावतीने देण्यात आलेल्या नागरिकांनी पालन करुन सहकार्य करावे, असे आवाहन श्री.डुडी यांनी केले आहे.

## उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांच्या पुढाकाराने महात्मा फुले स्मारक रहिवाशांच्या प्रलंबित प्रश्नांवर सकारात्मक चर्चा

■ **लोकांना विश्वासात घेऊन पुनर्वसनाची पुढील प्रक्रिया राबविण्यात येईल - डॉ. नीलम गोऱ्हे**

**मुंबई :** पुण्यातील महात्मा फुले स्मारक रहिवाशी कृती समितीच्या प्रलंबित प्रश्नांबाबत विधानभवनात आढावा घेण्यात आला. पुनर्वसनाची प्रक्रिया राबविताना स्थानिक रहिवाशांना विश्वासात घेण्यात यावे, असे निर्देश विधानपरिषद उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिले.

महात्मा फुले स्मारक रहिवाशी कृती समिती, पुणे यांच्या प्रलंबित प्रश्नांबाबत डॉ. नीलम गोऱ्हे यांच्या अध्यक्षतेखाली प्रत्यक्ष व ऑनलाईन बैठक पार पडली. या बैठकीत रहिवाशांच्या पुनर्वसन, मोबदला, फ्लॅट वाटप आणि सर्वे क्षणसंदर्भातील विविध मुद्द्यांवर सविस्तर चर्चा करण्यात आली.

बैठकीदरम्यान डॉ. नीलम गोऱ्हे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना इतर महानगरपालिकांमध्ये देण्यात आलेल्या मोबदल्याचा अभ्यास करण्यात यावा, असे निर्देश दिले. महानगरपालिका किती जागा सामावून घेऊ शकते याचाही अभ्यास करण्यात यावा. ज्या महानगरपालिकांमध्ये जितका मोबदला देण्यात आला आहे त्याचाही अभ्यास करण्यात येणे आवश्यक असल्याचे त्यांनी सांगितले.

उपसभापती डॉ. गोऱ्हे यांनी महानगरपालिकेच्या अधिकाऱ्यांना १५ तारखेला विशेष बैठक घेण्यात यावी, अशा सूचना दिल्या. संबंधित रहिवाशांसमोर धोरण मांडण्यात यावे, त्यांना आवाहन करण्यात यावे आणि त्यांचा विश्वास संपादन करण्यात यावा, असे त्यांनी सांगितले.

## खरीप हंगाम सन २०२५ राज्यस्तरीय पिकस्पर्धेत पुणे जिल्ह्यातील ८ शेतकरी विजेते

**पुणे :** राज्यात खरीप हंगाम सन २०२५ मध्ये भात, ज्वारी, बाजरी, मका, नाचणी, तूर, मूग, उडीद, सोयाबीन, भुईमुग व सुर्यफुल या ११ पिकांसाठी राज्य पातळीवरील पीकस्पर्धेत पुणे जिल्ह्यातील ८ शेतकरी विजेते झाले असल्याचे संजय काचोळे जिल्हा अधिक्षक कृषी अधिकारी पुणे यांनी कळविले आहे. ज्या शेतकऱ्यांची स्पर्धेत भाग घेतलेल्या पिकाची उत्पादकता तालुक्याच्या त्या पिकाच्या सरासरी उत्पादकतेच्या (त्या पिकाची मागील पाच वर्षांचे सरासरी उत्पादकता) दीडपट किंवा त्यापेक्षा अधिक आहे, अशा शेतकऱ्यांना पीक स्पर्धेतील पुरस्कारासाठी पात्र समजण्यात येते. सन २०२५-२६ राज्यस्तरीय पिक स्पर्धेत पिकनिहाय पुढील तालुक्यातील शेतकरी विजेते झाले आहेत. सोयाबीन आदिवासी गट प्रथम क्रमांक भाउ तुळशिराम वारे, ओतुर ता. जुन्नर, द्वितीय क्रमांक रामचंद्र विठोबा कातवारे, आलमे ता. जुन्नर, तृतीय क्रमांकअशोक राघु नाईकरे, कमान ता. खेड. सुर्यफुल सर्वसाधारण गटात प्रथम क्रमांक नारायण बाबा लोणकर, कऱ्हाटी ता. बारामती, पांडुरंग मारुती वाबळे, जळगाव कप ता. बारामती. भात आदिवासी गट प्रथम क्रमांक लक्ष्मण डोंगरु लोहकरे, मापोली ता. आंबेगाव, रामचंद्र चाहू कारोटे, दिगद ता. आंबेगाव. बाजरी सर्वसाधारण गटात तृतीय क्रमांक रायचंद बाबुराव शिंदे, विठ्ठलवाडी ता. शिरुर.

## नाशिक त्र्यंबकेश्वर सिंहस्थ कुंभमेळा बोधचिन्हाचे मुख्यमंत्री, दोन्ही उपमुख्यमंत्री आणि मान्यवरांच्या हस्ते अनावरण

**मुंबई :** नाशिक त्र्यंबकेश्वर येथे २०२७ मध्ये सिंहस्थ कुंभमेळा आयोजित होत आहे. या कुंभमेळ्याच्या बोधचिन्हाचे अनावरण सह्याद्री अतिथीगृह येथे झालेल्या कार्यक्रमात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे, उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार यांच्यासह मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले.

कुंभमेळ्याच्या लोगोसाठी कुंभमेळा प्राधिकरणाच्यावतीने स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत सुमारे तीन हजारांहून अधिक स्पर्धकांनी सहभाग घेतला. या स्पर्धकांमधून तीन उत्कृष्ट स्पर्धकांचा यावेळी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. यामध्ये प्रथम क्रमांक पटकावलेल्या पुणे येथील सुमित काटे यांना तीन लाख रुपयांचा धनादेश आणि सन्मानचिन्ह, द्वितीय क्रमांक पटकावलेल्या नोएडा येथील मयांक नायक यांना दोन लाख रुपयांचा धनादेश आणि सन्मानचिन्ह आणि तृतीय क्रमांक पटकावलेल्या पंढरपूर येथील पीयुष पिंपळनेरकर यांचा एक लाख रुपयांचा धनादेश आणि सन्मानचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले.

प्रसून जोशी, अश्विनी देशपांडे, मंदार राणे, वृषाली केकणे (देशमुख), बारिश दाते, विनय नारंग, डॉ. प्राजक्ता बास्ते, प्रफुल्ल सावंत, डॉ. दिनेश वैद्य, अँथनी लोपेझ आणि डॉ. किरण शिंदे यांसारख्या दिग्गज डिझाइन तज्ज्ञांच्या समितीने या प्रवेशिकांचे परिक्षण केले. सर्जनशीलता, नाविन्य, ब्रँड सुसंगतता आणि सादरीकरण या निकषांवर आधारित ही निवड करण्यात आली. या समितीचा मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते सन्मान करण्यात आला. प्राधिकरणाचे आयुक्त शेखर सिंह यांनी प्रास्ताविकाद्वारे कुंभमेळा आयोजन आणि लोगो स्पर्धेबाबत माहिती दिली.

## भिडेवाडा राष्ट्रीय स्मारकाचे काम येत्या वर्षभरात पूर्ण करणार-मंत्री अतुल सावे

**पुणे :** महात्मा ज्योतिबा फुले यांच्या २०० व्या जयंतीनिमित्त राज्य शासनाकडून विविध उपक्रमाचे आयोजन करण्याचा निर्णय घेतला आहे, याच पार्श्वभूमीवर भिडेवाडा राष्ट्रीय स्मारकाचे काम येत्या वर्षभरात पूर्ण करण्यात येईल, असे प्रतिपादन राज्याचे इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे यांनी केले.

श्री. सावे यांनी आज भिडेवाडा राष्ट्रीय स्मारकाच्या कामाची पाहणी केली, यावेळी ते बोलत होते. यावेळी अतिरिक्त आयुक्त प्रजित नायर, अधीक्षक अभियंता बिपिन शिंदे, महात्मा फुले स्मारक रहिवाशी कृती समितीचे अध्यक्ष निलेश गिरमे, पीएमपीएल संचालक तथा नगरसेवक अजय खेडेकर आदी पदाधिकारी उपस्थित होते.

श्री. सावे म्हणाले, क्रांतीसूर्य महात्मा फुले व क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या कार्याची माहिती नागरिकांना व्हावी, याकरिता राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि दिवंगत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्यासमवेत चर्चा करुन भिडेवाडा राष्ट्रीय स्मारकाचा विकास करण्यासाठी प्रयत्न करुन कामाची सुरुवात करण्यात आली होती.

## कर्मवीर दादासाहेब गायकवाड स्वाभिमान व सबळीकरण योजनेंतर्गत जमीन विक्रीसाठी अर्ज करण्याचे आवाहन

**पुणे :** अनुसूचित जाती व नवबौद्ध घटकांतील भूमिहीन व दारिद्रय रेषेखालील शेतमजुरांच्या आर्थिक सबळीकरणासाठी राबविण्यात येणाऱ्या कर्मवीर दादासाहेब गायकवाड स्वाभिमान व सबळीकरण योजना अंतर्गत पात्र लाभार्थ्यांना दोन एकर बागायती किंवा चार एकर जिरायती जमीन १०० टक्के शासन अनुदान तत्त्वावर उपलब्ध करून दिली जाते. या योजनेंतर्गत कसण्यायोग्य जमीन विक्री करण्यास इच्छुक असलेल्या जमीन मालकांनी सहाय्यक आयुक्त, समाजकल्याण, पुणे यांच्याकडे अर्ज सादर करावेत, असे आवाहन करण्यात आले आहे.

अर्ज करण्यासाठी सहायक आयुक्त, समाजकल्याण जिल्हा पुणे कार्यालय, सामाजिक न्याय भवन, सर्वे नं. १०४/१०५, विश्रांतवाडी पोलीस स्टेशनसमोर, येरवडा, पुणे - ४११००६. अधिक माहितीसाठी दूरध्वनी क्रमांक ०२०-२९७०६६११ वर संपर्क साधावा.

आवश्यक कागदपत्रे विहित नमुन्यातील अर्ज. शेतजमीन विक्रीबाबत तहसीलदार कार्यालयाकडे केलेले मूळ प्रतिज्ञापत्र. सक्षम प्राधिकाऱ्यांचा ७/१२ चा मूळ उतारा. ८ अ उतारा व डायरी उतारा. वारसांचे/कुटुंबातील सदस्यांचे ना हरकत प्रमाणपत्र.

## संगीत, संस्कृती आणि राष्ट्राभिमानाचा जागर : किल्ले पुरंदरावर 'जयतु शंभू' भव्य सांस्कृतिक कार्यक्रम

■ **छत्रपती संभाजी महाराजांच्या जीवनकार्यावर आधारित नेत्रदीपक सांस्कृतिक प्रस्तुती; विविध कलाप्रकार, ढोल पथक आणि मर्दानी खेळांचे आकर्षक सादरीकरण**

**पुणे :** हिंदवी स्वराज्याचे दुसरे छत्रपती, धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांच्या अद्वितीय शौर्य, राष्ट्रनिष्ठा आणि बलिदानाला अभिवादन करण्यासाठी जयतु शंभू या भव्य सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. सांस्कृतिक कार्य विभाग तथा सांस्कृतिक कार्य संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या वतीने आयोजित करण्यात येणाऱ्या या कार्यक्रमामध्ये विविध पारंपरिक कलाप्रकार, ढोल पथक, मर्दानी खेळ तसेच छत्रपती संभाजी महाराजांच्या जीवनावर आधारित विशेष सांस्कृतिक प्रस्तुती सादर करण्यात येणार आहे.

महाराष्ट्राच्या वैभवशाली इतिहासाची आणि समृद्ध सांस्कृतिक परंपरेची ओळख नव्या पिढीपर्यंत प्रभावीपणे पोहोचविण्याच्या उद्देशाने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे. छत्रपती संभाजी महाराज यांच्या संघर्षमय, पराक्रमी आणि प्रेरणादायी जीवनकार्याचे दर्शन या सांस्कृतिक सोहळ्यातून घडणार असून, शौर्य, राष्ट्रभक्ती आणि स्वराज्याचा विचार जनमानसात पोहोचविण्याचा प्रयत्न या माध्यमातून करण्यात येणार आहे. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक वैभवाचा अनुभव देणारे विविध लोककलाप्रकार आणि पारंपरिक सादरीकरणे हा कार्यक्रम अधिक भव्य आणि आकर्षक बनविणार आहेत.

या कार्यक्रमामध्ये पारंपरिक ढोल पथकांच्या दमदार तालांनी वातावरण दणाणून जाणार असून, मर्दानी खेळांच्या सादरीकरणातून मराठी शौर्यपरंपरेचे दर्शन घडणार आहे. तसेच छत्रपती संभाजी महाराजांच्या जीवनातील विविध प्रेरणादायी प्रसंगांवर आधारित सांस्कृतिक प्रस्तुती प्रेक्षकांना इतिहासाची अनुभूती देणार आहे. महाराष्ट्राच्या सांस्कृतिक आणि ऐतिहासिक वारशाचे जतन व संवर्धन करण्याच्या दृष्टीने हा कार्यक्रम महत्त्वपूर्ण ठरणार असल्याचे आयोजकांनी सांगितले.

हा भव्य सांस्कृतिक कार्यक्रम गुरवार, दि. १३ मे २०२६ रोजी सायंकाळी ६ वाजता ऐतिहासिक किल्ले पुरंदर, पुरंदर रोड, घेरापुरंदर, जि. पुणे येथे आयोजित करण्यात आला आहे. किल्ले पुरंदराच्या ऐतिहासिक वातावरणात साकार होणारा हा कार्यक्रम नागरिकांसाठी विशेष आकर्षण ठरणार आहे.